हया प्रार्थना वाचत असताना दिव्य अग्नी
स्वतःकडे येऊ दे आणि स्वतः भोवती वेढला जाऊ दे.

**मी दिव्य अग्नीचा प्राणी आहे.**
**मी ती पवित्रता आहे ज्याची ईश्वर अभिलाषा करतात.**

(दररोज ३ मिनीटे किंवा आवश्यकतेनुसार
अधिक कितीही वेळा)
माझा आत्मा दिव्य अग्नीचा आत्मा आहे.
माझा आत्मा ती पवित्रता आहे ज्याची ईश्वर अभिलाषा करतात.
(दररोज ३ मिनीटे किंवा आवश्यकतेनुसार अधिक कितीही वेळा)

(हया दोन ओळी स्वतःचे घर,कामाचे ठिकाण, गाव, शहर, देश, मुले, पती,पत्नी किंवा अन्य कुठल्याही व्यक्तीसाठी म्हणू शकता, हे प्रत्येकी १ मिनीट करावे.)

उदाहरणार्थ:-
माझे घर दिव्य अग्नीची वास्तू आहे.
माझे घर ती पवित्रता आहे ज्याची ईश्वर अभिलाषा करतात.
(१ मिनीट)

पृथ्वी, आकाश आणि महासागर हयातील नैसर्गिक प्राणी हे दिव्य अग्नीचे प्राणी आहेत.पृथ्वी, आकाश आणि महासागर हयातील नैसर्गिक प्राणी ती पवित्रता आहेत ज्याची ईश्वर अभिलाषा करतात. (१ मिनीट)

पृथ्वी माता दिव्य अग्नीचा ग्रह आहे.
पृथ्वी माता ती पवित्रता आहे ज्याची ईश्वर अभिलाषा करतात.
(१ मिनीट)

आपला चंद्र दिव्य अग्नीचा उपग्रह आहे.
आपला चंद्र ती पवित्रता आहे ज्याची ईश्वर अभिलाषा करतात.
(१ मिनीट)

आपला सूर्य दिव्य अग्नीचा तारा आहे
आपला सूर्य ती पवित्रता आहे ज्याची ईश्वर अभिलाषा करतात. (१ मिनीट)

Copyright @ All rights reserved


# मी आहे

मी हे भौतिक शरीर नाही
मी आहे ते मी आहे (७ सेकंद शांत रहा)

मी ही चुकीची भावना नाही
मी आहे ते मी आहे (७ सेकंद शांत रहा)

मी हा चुकीचा विचार नाही
मी आहे ते मी आहे (७ सेकंद शांत रहा)

मी हे अस्वस्थ मन नाही
मी आहे ते मी आहे (७ सेकंद शांत रहा)

मी आत्मा आहे
माझे शरीर माझ्या आत्म्याचे मंदिर आहे

मी एक दैवी ठिणगी आहे
ईश्वर माझा निर्माणकर्ता आहे.
मी ईश्वराशी जोडलेला आहे.

प्रत्येक दिवशी मी माझ्या कर्माचे संतुलन करीत आहे.

मी हया दैवी मार्गदर्शनाचा व योजनेचा स्वीकार करीत आहे.

मी तन, मन आणि आत्मा हया रूपांतील ईश्वराची परिपूर्ण व्यक्त कृती आहे.

मी ईश्वराचे पावित्र्य आहे व ईश्वराशी समरूप आहे.
मी ती पवित्रता आहे ज्याची ईश्वर अभिलाषा करतात

मी आहे ते मी आहे
मी आहे ते मी आहे
मी आहे ते मी आहे

मी ईश्वराशी जोडलेला आहे.
मी सर्वांशी जोडलेला आहे.

Copyright @ All rights reserved


# मी प्रकाश आहे

मी प्रकाश आहे, झगझगीत प्रकाश,
उत्सर्जित होणारा प्रकाश, तीव्र प्रकाश,

ईश्वर माझ्यातील अंधःकाराचा क्षय करून त्याचे प्रकाशात रूपांतर करीत आहेत.

आज मी केंद्रीय सूर्याचा केंद्रबिंदू आहे.
माझ्यात स्फटिकाप्रमाणे निर्मळ नदी वहात आहे.
मानवी विचारांमुळे व भावनांमुळे कधीही न बदलणारा प्रकाशाचा जिवंत झरा वहात आहे.

मी दिव्यतेची सीमाचौकी आहे.

मी अफाट प्रकाशाची नदी आहे जी माझा वापर करणाऱ्या अंधःकाराला गिळंकृत करते.

मी आहे, मी आहे, मी प्रकाश आहे.

मी रहातो/रहाते, मी रहातो/रहाते,
मी प्रकाशात रहातो/रहाते.

माझे संपूर्ण आकारमान प्रकाश आहे.
माझी शुद्धतम तीव्रता प्रकाश आहे.
मी प्रकाश, प्रकाश, प्रकाश आहे.

जेथे जेथे मी जाईन तेथे तेथे प्रकाशाचा प्रचंड झोत घेऊन जाईन.
ईश्वराचे आशीर्वचन आणि स्वर्गीय राज्याचा उद्देश बळकट करून सर्वत्र पोहोचवत आहे.

मी प्रकाश आहे, प्रकाश आहे, प्रकाश आहे.

Copyright @ All rights reserved


# पृथ्वीमातेसाठी प्रार्थना

हे सर्वोच्च परमेश्वरा, दैवी पिता, दैवी माता,
माझा उच्चतर आत्मा, माझे अध्यात्मिक मार्गदर्शक,
सहाय्यक व अध्यापक,
समस्त अध्यात्मिक मार्गदर्शक, सहाय्यक व अध्यापक,
समस्त उपचारक देवदूत,
पृथ्वीमातेचे दिव्य रक्षक,
पृथ्वीमातेची समस्त प्राणी-सृष्टी,
महान कार्मिक मंडळ,

ईश्वरा, हया पृथ्वीमातेवर आपल्या आशीर्वादाचे साधन बनण्यासाठी मी विनम्रतेने आपल्या दिव्य आशीर्वादासाठी कळकळीने प्रार्थना करीत आहे. त्यानुसार कृपया मला मार्गदर्शन करावे व माझे संरक्षण करावे.

मी आहे ते मी आहे.

पृथ्वीमातेवर दैवी प्रकाश, दैवी शक्ति व दैवी ज्ञान राहो.
पृथ्वीमातेवरील सांघिक वृत्तीला व एकतेला प्रतिबंध करणाऱ्या नकारात्मक शक्तिला हा दिव्य प्रकाश झगझगीत करू दे.

पृथ्वीमातेवर शांती व सुसंगतता राहू दे.
पृथ्वीमातेवर अन्न, पाणी व धन हयांची सुबत्ता असू दे
पृथ्वीमातेला पुनर्जीवन मिळो.
सर्व प्राणीमात्रांमध्ये मुबलक प्रेम, दयाळूपणा,
करूणा, आनंद आणि अध्यात्म असू दे.

पृथ्वीमातेवरील ईश्वरी ज्योतीच्या समस्त
रक्षकांवर दिव्य प्रकाश, दिव्य शक्ति, दिव्य बुद्धी,
दिव्य ज्ञान हयांचा आशीर्वाद असू दे.

हे ईश्वरा प्रत्येकातील शंका व भीती
बाहेर फेकावी आणि सर्वांमध्ये एकता आणावी.

हे ईश्वरा, धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद,

Copyright @ All rights reserved

## पूजास्थानासाठी प्रार्थना

हे सर्वोच्च परमेश्वरा, दैवी पिता, दैवी माता,
माझा उच्चतर आत्मा, माझे अध्यात्मिक मार्गदर्शक,
सहाय्यक आणि अध्यापक, समस्त अध्यात्मिक
मार्गदर्शक, सहाय्यक आणि अध्यापक,
समस्त उपचारक देवदूत आणि दैवी प्राणी
महान कार्मिक मंडळ,

ईश्वरा, हया स्थानी आपल्या आशीर्वादाचे साधन बनण्याकरीता मी विनम्रतेने दिव्य आशीर्वादासाठी प्रार्थना करीत आहे. त्यानुसार कृपया मला मार्गदर्शन करावे व माझे संरक्षण करावे.

मी आहे ते मी आहे.

हया स्थानी मुबलक दिव्य प्रकाश राहू दे. दिव्य प्रकाशाचा दिव्य अग्नी होऊ दे आणि सर्व नकारात्मक शक्तिला प्रज्वलित करुन तिचे प्रकाशात रुपान्तर होऊ दे. हया जागेच्या प्रत्येक भागात हा दिव्य अग्नीचा झोत प्रवाहित व्हावा. तिथे अग्नी, अग्नी, अग्नी आणि फक्त दिव्य अग्नी असावा.

दिव्य प्रेमाची, दिव्य करुणेची, दिव्य दयाळूपणाची, दिव्य उपचारक ऊर्जेची मुबलकता, समृध्दी, आनंद, दैवी सलोखा, अध्यात्म व दैवी आनंद हयांची मुबलकता हया सर्वांचा हया स्थानावर आशीर्वाद असावा.

कृपया सर्वांमधील सर्व भीती व शंका दूर व्हाव्यात.

इथे उपचारासाठी येणारा प्रत्येक जण स्वस्थ होऊ दे. प्रत्येकाला ज्ञानाचा व माहितीचा आशीर्वाद प्राप्त होऊ दे. सर्व उदासीनता आनंदाने व प्रसन्नतेने भरुन राहू दे. प्रत्येकाला समृध्दिचा आशीर्वाद मिळो. प्रत्येकाला देण्याची व विभागून देण्याची इच्छा होवो. सर्वांमध्ये एकता राहू दे. प्रत्येकाच्या हृदयात शांतता, सुसंगतता आणि एकता भरुन राहू दे. इथे हजर असणाऱ्या सर्व दिव्य जीवांना दिव्य प्रकाश, दिव्य शक्ति, दिव्य प्रेम, दिव्य करुणा, दिव्य दयाळूपणा, दिव्य ज्ञान, दिव्य माहिती आणि अध्यात्म हया सर्वांचा आशीर्वाद अधिक मुबलकतेने प्राप्त होवो.

रक्षणकर्त्यांना दिव्य मार्गदर्शनाचा, पवित्र सेवाभावाचा व प्रामाणिकपणाचा आशीर्वाद मिळो.

हे ईश्वरा धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद.

Copyright @ All rights reserved


# शिक्षण तुमच्या निद्रेत

हे सर्वोच्च परमेश्वरा,
दैवी पिता व माता,
माझा उच्चतर आत्मा,
माझे सर्व अध्यात्मिक मार्गदर्शक आणि अध्यापक,
कृपया आज माझे संरक्षण करावे व
माझ्या सूक्ष्म शरीरातील
अचूक दिव्य विद्यालयासाठी मार्गदर्शन करावे,
जेणेकरून आज निद्रेत
मी............... शिकू शकेन.
धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद.

सुखावह स्थितीत आडवे होऊन झोपी जा व
डोळे बंद करा, धीमा व खोल श्वास घेत
श्वासावर लक्ष केंद्रीत करा.
जेव्हां तुम्ही सकाळी उठाल तेव्हां
कृपया ह्या शिक्षणासाठी म्हणा,
धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद.

Copyright @ All rights reserved


## अवयव क्षमा- प्रार्थना

(अवयवाचे नाव), (तुमचे वय) वर्षानंतर मला उमगले कि
तुम्ही कुठे आहात, आभारी आहे.
तुम्ही कुठे आहात हे मला जाणवू न देता तुम्ही माझी काळजी घेतली.
तुम्ही रात्रंदिवस खूप कष्टाचे काम केले. इतकी वर्षे तुम्हाला न
आवडणाऱ्या गोष्टी टाकून मी तुम्हाला बिघडवले.
कृपया मला माफ करावे.
मला तुम्ही हवे आहात. जर मी जाणता - अजाणता कुठल्याही
मार्गाने तुम्हाला अपाय केला असेन तर मला माफ करावे.
आत्तापासून मी तुमची काळजी घेईन.
मी............. खाणार/पिणार नाही. आता मला कळले
आहे कि हे तुमच्यासाठी चांगले नाही. माझ्या आयुष्याच्या
अंतापर्यंत कृपया माझ्याबरोबर रहावे.
मला तुम्ही हवे आहात. माझे तुमच्यावर प्रेम आहे. तुमचे
कशामुळे जास्त नुकसान होते ते आता कळल्याने मी
आत्तापासून तुमची चांगली काळजी घेईन.
मला निरोगी ठेवल्याबद्दल आभारी आहे.
धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद !

<u>उदाहरण :- ३५ वर्षीय व्यक्तिचे स्वादुपिंड</u> **(Pancreas)**
हे स्वादुपिंड ! मला ३५ वर्षानंतर कळले कि तुम्ही कुठे आहात,
आभारी आहे.
तुम्ही कुठे आहात हे मला जाणवू न देता तुम्ही माझी काळजी घेतली.
माझ्याकरिता तुम्ही रात्रंदिवस खुप कष्टाचे काम केले आहे. तुम्हाला न
आवडणाऱ्या गोष्टी घालून मी तुम्हाला बिघडवले आहे.
कृपया मला माफ करावे.
मला तुमची गरज आहे. जर मी जाणता- अजाणता कुठल्याही मार्गाने
तुम्हाला अपाय केला असेन तर कृपया मला माफ करा. आत्तापासून
मी तुमची काळजी घेईन
मी साखर, गोड पदार्थ, बेसुमार कार्बोहायड्रेटस घेणार नाही. आत्ता मी
जाणले आहे कि ते तुमच्यासाठी चांगले नाहीत.
माझ्या जीवनाच्या अंतापर्यंत तुम्ही मला हवे आहात.
मला तुम्ही हवे आहात. माझे तुमच्यावर प्रेम आहे. तुमचे अधिकाधिक
नुकसान कशामुळे होते ते कळल्याने मी तुमची चांगली काळजी घेईन.

मला निरोगी ठेवल्याबद्दल आभारी आहे.
धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद !

Copyright @ All rights reserved


# अध्यात्मिक प्रार्थना

एखाद्याची अध्यात्मिक ऊर्जा
वृद्धिंगत करण्यासाठी आणि
उच्चतर आत्म्याशी संधान
साधण्यासाठी प्रार्थना

**www.pranaviolethealing.com**